पोलीस अधीक्षक, कार्यालय गडचिरोली
जनसंपर्क शाखा
P.R.O Office, Gadchiroli
**Phone No.** 07132223142 **Address**: SP Office,Gadchiroli
**E-mail** : prospoffice.gadchiroli@gmail.com

# वार्तापत्र

दिनांक- २१/०९/२०२०

## दोन वर्षात ऐतिहासिक कामगिरीची नोंद करत गडचिरोली पोलीस दलाने मोडले नक्षलवादाचे कंबरडे

- **दुर्गम भागातील नागरिकांच्या उन्नतीसाठी अनेक नाविण्यपुर्ण उपक्रमांची सुरुवात**

मा. पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे साो. यांच्या नेतृत्वात गडचिरोली पोलीस दलाने मागील दोन वर्षापासुन नक्षलवादयांवर अंकुश ठेवण्यात यश प्राप्त केले आहे गडचिरोली पोलीस दलाने अनेक ऐतिहासिक कामगिरीची नोंद या दोन वर्षात केली असुन यामुळे गडचिरोली जिल्हयाची वाटचाल ही नक्षलमुक्तीकडे होण्यास निश्चितच बळ मिळाले आहे. या काळात घातपात व देशविघातक कृत्य करण्याच्या तयारीत असलेल्या नक्षलींचे १० कॅम्प गडचिरोली पोलीस दलातील बहादुर जवानांनी उध्द्वस्त केले. तर पोलीस-नक्षल चकमकीत एकुण २० नक्षलींना यमसदनी धाडण्यात यश प्राप्त केले आहे. यामध्ये जहाल महिला नक्षलवादी सृजनक्का व रामको नरोटे हिचा समावेश आहे त्याचबरोबर जिल्हयात हिंसक व देशविरोधी घातक कृत्य करण्याऱ्या ५३ नक्षलींना अटक करण्यात गडचिरोली पोलीस दलास यश मिळाले आहे. यामध्ये दिनांक ०१ मे २०१९ रोजी मौजा जांभुळखेडा येथे भुसुरुंग स्फोटातील प्रमुख सहभाग असणाऱ्या जहाल महिला नक्षली डीकेएसझेडसी (DKSZCM) मेंबर नर्मदक्का ऊर्फ अल्लुरी उषाराणी उप्पगुंटी सुब्बाराव व तिचा पती डीकेएसझेडसी (DKSZCM) मेंबर किरण यांच्यासह कोरची दलम डीव्हिसी दिनकर गोटा, टिपागड दलम डिव्हिसी यशवंत बोगा या बड्या नक्षली कॅडरचा समावेश आहे मा. पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे साो. यांच्या नेतृत्वात एकीकडे नक्षलविरोधात आक्रमकपणे अभियान राबविले जात असतांना दुसरीकडे गडचिरोली पोलीस दलाने नक्षलमध्ये गेलेल्या आदिवासी तरुण-तरुणींना मुळ प्रवाहात परत आणण्यासाठी जोरदार प्रयत्न सरु केले यामध्ये नक्षलमध्ये गेलेल्या तरुण-तरुणींच्या घरी जावुन भेटी देण्यात आल्या. गडचिरोली पोलीस दलाची आक्रमक आणि नक्षलविरोधी अभियाने त्याचबरोबर वरिष्ठ नक्षलींना झालेली अटक या सर्व बाबींचा परिपाक म्हणुनच गेल्या दोन वर्षात गडचिरोली जिल्हा पोलीस अधीक्षकांसमोर एकुण ४५ नक्षलींनी आत्मसमर्पण केले. विशेष व ऐतिहासिक बाब म्हणजे गडचिरोली पोलीस दलाच्या इतिहासात सर्वप्रथमच एका संपुर्ण दलमने (चातगाव दलम) आत्मसमर्पण केले. विशेष व ऐतिहासिक बाब म्हणजे चातगाव दलमचा डीव्हिसी विलास कोल्हा याने एके- ४७ हत्यारासह आत्मसमर्पण केले गडचिरोली पोलीस दलाच्या नक्षलविरोधी अभियानास मिळालेले आणखी मोठे यश होते.

अतिदुर्गम गडचिरोली जिल्ह्यातील निवडणुका शांततेत व कुठलीही अनुचित घटना न घडू देता निर्विघ्नपणे पार पाडणे तसे जिकीरिचेच, परंतु मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांच्या नेतृत्वात गडचिरोली पोलीस दलातील प्रत्येक जवानाने घेतलेल्या अथक प्रयत्नांमुळे जिल्ह्याच्या २५ वर्षाच्या इतिहासात जिल्ह्यात विधानसभा सार्वत्रिक निवडणुक- २०१९ बरोबरच लोकसभा सार्वत्रिक निवडणुक – २०१९ कोणतीही अनुचित घटना न घडता शांततेत पार

पाडण्यात यश प्राप्त केले. गडचिरोली जिल्ह्याच्या नक्षलविरोधी अभियानास मिळालेले हे ऐतिहासिक यश होय.

गडचिरोली पोलीस दल मा. पोलीस अधीक्षक श्री शैलेश बलकवडे सा़ो यांच्या नेतृत्वात नक्षलविरोधी कामगिरी प्रभावीपणे पार पाडत असतांनाच गडचिरोली जिल्हयातील दुर्गम व अतिदुर्गम भागातील आदिवासी नागरिकांच्या उन्नतीसाठी अनेक नाविण्यापुर्ण योजनांची सुरुवात करण्यात आली. यामध्ये आदिवासी महिलांच्या अंगी असलेल्या हस्तकौशल्याला वाव देण्यासाठी राणी दुर्गावती हस्तकला स्पर्धा जगाच्या कानाकोपऱ्यातील घडामोडी आदिवासी विदयार्थ्यांपर्यंत पोहचाव्यात तसेच त्यांना स्पर्धा परीक्षांची आवड निर्माण व्हावी याकरीता प्रयास योजना, कोविड-१९ साथ रोगाच्या अनुषंगाने विद्यार्थ्यांच्या शिक्षणाला खीळ बसु नये म्हणुन लर्निन फार्म प्रोग्राम सुरु करण्यात आला. या माध्यमातुन गडचिरोली पोलीस दलाचे यु-ट्युब चॅनल सुरु करुन विद्यार्थ्यांना शिक्षण देणे अखंडपणे चालु आहे. खेळाडुंसाठी व्हॉलीबॉल, कबड्डी स्पर्धा घेण्यात आल्या. यामध्ये जिल्हाभरातील ५० हजारांपेक्षा जास्त खेळांडुनी सहभाग नोंदविला. मॅराथान स्पर्धा तसेच शेतकऱ्यांसाठी वीर बाबुराव सेडमाके कृषी मेळाव्यांची सुरुवात, बेरोजगार युवक-युवतींना रोजगार प्राप्त करुन देण्याच्या उद्देशाने रोजगार मेळावा ॲप सुरु करण्यात आले. आदिवासी संस्कृतीची सर्व जगाला ओळख करुन देण्यासाठी आदिवासी समाजाचे पारंपारिक रेला नृत्यास प्रजासत्ताक दिनी मुंबई येथे होणाऱ्या मुख्य ध्वजारोहण समारंभाच्या कार्यक्रमात व्यासपीठ मिळवुन दिले. अंधांसाठी ऑपरेशन रोशनी योजना राबवित दुर्गम भागातील अनेक नागरिकांच्या जीवनातील अंधकार दुर केला. गावदत्तक योजनेसारख्या नाविण्यपुर्ण उपक्रम राबवित नक्षलदृष्टया अतिसंवेदनशिल समजले जाणारे मौजा कसनासुर हे गाव मा. पोलीस अधीक्षकांनी दत्तक घेत या गावाच्या विकासासाठी भरीव काम केले. महिलादिनाचे औचित्य साधत नक्षलवादयांकडुन आदिवासी महिलांवर होणाऱ्या अत्याचाराविरोधात नक्षलवादयांकडुन खुन करण्यात आलेल्या होतकरु विदयार्थीनी बेबी मडावी हिला न्याय देण्यासाठी गडचिरोली पोलीस दलाचे माध्यमातुन बेबी मडावी महिला साखळीचे आयोजन करुन आदिवासी महिलांना आत्मनिर्भर व स्वाभिमानाची जाणीव करुन दिली. आदिवासी बांधवांना अनेक शासकीय योजनांचा लाभ होण्यासाठी आवश्यक असलेले जात प्रमाणपत्र मिळवुन देण्यासाठी प्रोजेक्ट प्रगती योजना राबवण्यात आली. गडचिरोली पोलीस दलाने राबवलेल्या विविध व नाविण्यापुर्ण उपक्रमामुळे जिल्हयातील नागरिकांमध्ये गडचिरोली पोलीस दलाप्रती विश्वासाची व सौहार्दाची भावना निर्माण होण्यास मदत मिळाली. याचा परिपाक म्हणुन अनेक तरुण-तरुणी नक्षलविचारांपासुन दुर राहण्यास झाली.

उपविभाग जिमलगट्टा अंतर्गत येणाऱ्या मौजा किष्टापुर नाल्याच्या बांधकामास परवानगी मिळावी व या भागातील २५ ते ३० गावांना भेडसावणारा दळणवळणाचा प्रश्न सुटावा याकरीता शासनाकडे सतत पाठपुरावा करून मा. पोलीस अधीक्षकांनी सदर नाल्याच्या बांधकामास मंजुरी मिळविली क्रुर नक्षलींनी किष्टापूर नाल्याचे बांधकाम करणारी वाहने जाळत काम बंद पडावे यासाठी प्रयत्न केला. यावेळी मा. पोलीस अधीक्षक श्री. शैलेश बलकवडे सो. यांनी पुढाकार घेत सदर काम कदापी थांबविण्यात येणार नाही. व पावसाळ्यापुर्वी सदर पुलाचे काम पुर्ण करण्यात येईल असे वचन किष्टापूर पंचक्रोशीतील नागरिकांना दिले. मा. पोलीस अधीक्षकांच्या नेतृत्वात गडचिरोली पोलीस दलाने सदर जबाबदारी समर्थपणे पेलुन पावसाळ्यापुर्वी किष्टापूर नाल्यावरील पुलाचे बांधकाम पुर्णत्वास नेत या भागातील २५ ते ३० गावांचा दळणवळणाचा प्रश्न कायमचा सोडविला. त्याचबरोबर मौजा कटेझरी, मौजा गुर्रेकसा येथील घराघरात पाणी पोहचवून महीला व

लहान मुले यांच्या सोबतच या भागातील नागरिकांनी पिण्याच्या पाण्याची वर्षानुवर्ष चालणारी वणवण थांबविली.

पोलीस अधिकारी, कर्मचारी आणि त्यांचे कुटुंबियांकरीता अनेक कल्याणकारी उपक्रम हाती घेण्यात आले. गडचिरोली व अहेरी येथे जवानांसाठी सर्व सोयीसुविधांनी युक्त अश्या जिमची निर्मीती करण्यात आली. पोलीसांना कॅशलेस सुविधा उपलब्ध असलेले सुविधा केंद्रांची उभारणी करण्यात आली. अत्याधुनिक मशनरी व सर्व सेवा एकाच छताखाली मिळाणारे तसेच तंज्ञ डॉक्टरांची टीम सदैव सेवेत दाखल असलेले बहुउद्देशीय चिकीत्सा केंद्राची निर्मीती करण्यात आली. गडचिरोली जिल्ह्यात नक्षलविरोधात लढा देत आपल्या प्राणांची आहुती देणाऱ्या शहीद जवांनाच्या आठवणी ताज्या करणाऱ्या शौर्य स्थळाची निर्मीती करण्यात आली.

गडचिरोली जिल्ह्यात दारुविक्रीवर अंकुश राहावा यासाठी कडक पाऊले उचलत गेल्या दोन वर्षात दारुविक्रीस आळा बसावा म्हणुन भरारी पथकाची नेमणुक करत जवळ-जवळ ४ कोटीचा दारु साठा व मुद्देमाल जप्त करण्यात गडचिरोली पोलीस दलाने यश प्राप्त केले.

## ऐतिहासिक कामगिरी

- आदिवासी संस्कृतीला चालना देण्यासाठी आदिवासी रेला नृत्यास प्रजासत्ताकदिनी मुंबई येथे होणाऱ्या मुख्य ध्वजारोहण सोहळयातील कार्यक्रमात व्यासपीठ मिळवुन दिले.
- गेल्या २५ वर्षाच्या इतिहासात प्रथमच लोकसभा सार्वत्रिक निवडणुक -२०१९ तसेच विधानसभा सार्वत्रिक निवडणुक- २०१९ कोणतीही अनुचित घटना न घडता शांततेत पार पडल्या.
- जिल्हाच्या इतिहासात प्रथमच जहाल नक्षली चातगाव दलम डीव्हीसी विलास कोल्हाचे एके-४७ हत्यारासह आत्मसमर्पण.
- जिल्हाच्या इतिहासात प्रथमच संपुर्ण चातगाव दलमचे आत्मसमर्पण व संपुर्ण दलमने आत्मसमर्पण करण्याची पहिलीच वेळ.

## नक्षलविरोधी ठळक कार्यवाही

- पोलीस नक्षल चकमकीत १७ नक्षलींचा खात्मा
- ५३ नक्षलींना अटक.
- ४५ नक्षलवाद्यांचे आत्मसमर्पण
- देश विघातक कृत्य करण्याच्या तयारीत असलेल्या नक्षलवाद्यांचे १० नक्षल कॅम्प उध्वस्त.

## वचनपुर्ती

- किष्टापूर नाला पुलाची बांधणी २५ ते ३० गावांना मिळणार लाभ.
- कटेझरी नळ योजना
- गुर्रेकसा नळ योजना

## नागरी कृती शाखेमार्फत सुरु केलेले नाविण्यपुर्ण उपक्रम

- महीलांसाठी - राणी दुर्गावती हस्तकला स्पर्धा, ५,००० महीलांचा सहभाग.
- विद्यार्थ्यांसाठी – प्रयास योजना, जिल्हाभरातील ३०,००० विद्यार्थ्यांचा सहभाग, कोविड-१९ साथरोगाच्या अनुषंगाने लर्निंग फ्राम होम प्रोग्राम कार्यक्रम.
- बेरोजगारांकरीता- रोजगार मेळावा ॲप, ५००० बेरोजगार तरुण-तरुणींची नोंदणी.
- शासकीय योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी- प्रोजेक्ट प्रगती, ७००० नागरिकांना जात प्रमाणपत्राचे वाटप
- शेतकरी बांधवांसाठी- वीर बाबुराव सेडमाके कृषी मेळावा.
- अंधासाठी- ऑपरेशन रोशनी.
- गावाच्या सर्वांगिण विकासासाठी - 'गावदत्तक' योजना. मौजा कसनासुर हे मा. पोलीस अधीक्षक सा. यांनी दत्तक घेतलेले पहिले गाव होय.

## दारुबंदीसाठी पाऊले

- एमपी आयडी कायदयानुसार दोन बडया दारुविक्रेत्याविरोधात प्रतिबंधात्मक कार्यवाही
- भरारी पथकाची निर्मीती करुन जवळ-जवळ ४ कोटीची दारु व मुद्देमाल जप्त

## पोलीस कल्याणासाठी राबविलेले उपक्रम

- पोलीस अधिकारी व कर्मचारी यांचे करीता सुसज्ज व एकाच छत्राखाली सर्वसोयी सुविधांनी युक्त असे भव्य बहुउद्देशिय चिकीत्सा केंद्र
- कॅशलेश सेवा उपलब्ध असलेले "सुविधा केंद्रा" ची निर्मीती